# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 12 August 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १२ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

बिहारच्या जहानाबाद इथल्या बाबा सिद्धेश्वरनाथ मंदिरात चेंगराचेंगरी होऊन तीन महिलांसह सात भाविकांचा मृत्यू झाला, तर दहाहून अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींवर गया इथल्या रुग्णलयात उपचार सुरु आहेत. स्थानिक विक्रेते आणि भाविकांमध्ये काही कारणाने वाद झाल्याने मध्यरात्री चेंगराचेंगरी झाली, मंदिर परिसर अतिशय अरुंद असल्याने चेंगराचेंगरीमुळे गर्दी नियंत्रणाबाहेर गेल्याचं, पोलिस अधिक्षक अरविंद प्रताप सिंह यांनी सांगितलं.

****

बडतर्फ प्रशिक्षक प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांना २१ ऑगस्टपर्यंत अटक न करण्याचे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिले आहेत. नागरी सेवा परीक्षा फसवणूक करून उत्तीर्ण झाल्याचा आरोप करत दिल्ली पोलिसांनी खेडकर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या जामिन अर्जावर न्यायालयानं दिल्ली पोलिस आणि केंद्रीय लोकसवा आयोगाकडून उत्तर मागवलं आहे.

****

महसूल गुप्तचर संचालनालयानं काल नागपूर इथं मेफेड्रोन कारखान्यावर छापा टाकून सुमारे ७८ कोटी रुपये किमतीचे ५२ किलो मेफेड्रोन द्रव स्वरूपात जप्त केले. यासोबत कच्चा माल आणि उपकरणे देखील जप्त करण्यात आली आहेत. शहरातल्या एका निर्माणाधीन इमारतीत मेफेड्रोनचं उत्पादन सुरू असल्याची माहित मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कोठडीत पाठवण्यात आलं आहे.

****

महसूल पंधरवड्यानिमित्त नांदेड इथं काल एक धाव सुरक्षेची ही मिनी मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी जिल्हाधिकारी

कार्यालय इथं हिरवा झेंडा दाखवून या रॅलीची सुरुवात केली. विविध आपत्ती संदर्भात युवकांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांनी सुरक्षिततेचे नियम पाळावे या हेतूने या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्ह्यातल्या अनेक शाळा – महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला होता.

****

प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे लाभार्थी असणाऱ्या नांदेड जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये नुकसान भरपाईची रक्कम २० ऑगस्ट पर्यंत जमा केली जाणार आहे. आतापर्यंत ११९ कोटी रुपये जमा झाले आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पीक विमा जमा झाला नसेल, त्यांनी २० ऑगस्टनंतर तालुकास्तरीय कार्यालयात चौकशी करावी, असं आवाहन कृषी विभागाने केलं आहे.

****

राज्यात पावसाचा जोर काहीसा ओसरला, तरी विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. सिंचन प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रांमध्येही चांगला पाऊस झाल्याने जलसाठ्यात वाढ झाली आहे. सध्या विदर्भातल्या सहा मोठ्या प्रकल्पांमधून विसर्ग सुरू आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातल्या उर्ध्व वर्धा, यवतमाळ जिल्ह्यातल्या बेंबळा, नागपूर जिल्ह्यातल्या पेंच तोतलाडोह, गोंदिया जिल्ह्यातल्या इटियाडोह, भंडारा जिल्ह्यातल्या गोसीखुर्द, आणि वर्धा जिल्ह्यातल्या निम्न वर्धा प्रकल्पांचा समावेश आहे. वैनगंगा, वर्धा आणि बेंबळा नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागपूर विभागातल्या मोठ्या प्रकल्पांमध्ये ७४ पूर्णांक ११ टक्के, तर अमरावती विभागातल्या प्रकल्पांमध्ये ६० पूर्णांक १२ टक्के पाणीसाठा झाला आहे.

****

अहमदनगर जिल्ह्यातल्या मुळा धरणाची पाणी पातळी वाढल्यानं आज धरणातून दोन हजार घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यकता भासल्यास मुळा धरणातून नदीपात्रामध्ये टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवण्यात येणार असून, नदीकाठच्या गावांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे.

****

पुढील महिन्यात हरियाणा इथ महिलांसाठी पहिली जागतिक कबड्डी स्पर्धा होणार असून, त्याला वैश्विक प्रवासी महिला कबड्डी लीग असं नाव देण्यात आल आहे. त्यामध्ये १५ देशातले महिला संघ सहभागी होणार आहेत. जागतिक स्तरावर कबड्डी

खेळाला महत्व प्राप्त व्हावं, या खेळाचा ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये समावेश व्हावा आणि २०३६ मध्ये भारतामध्ये ऑलिम्पिक स्पर्धांचं आयोजन करण्याच्या दृष्टीने भारताच्या दावेदारीला बळ प्राप्त व्हाव, या उद्देशाने भारतात हरियाणामध्ये या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. इंग्लंड, पोलँड, अरजेंटिना, इटली आदी देशांच्या संघांनी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी या महिन्याच्या २५ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा ११३ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार येत्या २३ तारखेपर्यंत 1800-11-7800 या नि:शुल्क क्रमांकावर, नरेंद्र मोदी ॲप वर किंवा माय जीओव्ही ओपन फोरमवर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****